# ‘डॉक्टर, संशोधकांनी एकत्र येणे आवश्यक’

म. टा. प्रतिनिधी, पुणे



> “ तंत्रज्ञानाचा वापर वाढत असल्याने डॉक्टरांनी केवळ वैद्यकीय क्षेत्रापुरते मर्यादित राहू नये. डॉक्टरांनी वैद्यकीय क्षेत्रात तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करावा.
>
> – डॉ. आनंद देशपांडे

‘भारतामध्ये वापरण्यात येणारी बहुतांश औषधे परदेशांतील रुग्णांवरील संशोधनावर आधारित आहेत. भारताने औषधांसाठी अन्य देशांवर अवलंबून न राहता स्वतः संशोधन करून निर्मिती करावी. वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन आणि औषध निर्मितीसाठी भारतीय संशोधक आणि डॉक्टरांनी एकत्रित यावे,’ असे आवाहन पर्सिस्टंट सिस्टीम्सचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आनंद देशपांडे यांनी केले.

डॉ. अविनाश भोंडवे, डॉ. दीपक शिकारपूर लिखित आणि विश्वकर्मा पब्लिकेशन प्रकाशित ‘आरोग्यसेवेतील डिजिटल आणि एआय क्रांती’ या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवारी डॉ. देशपांडे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया, विश्वकर्मा युनिव्हर्सिटी व विश्वकर्मा ग्रुपचे अध्यक्ष भरत अगरवाल, विश्वकर्मा पब्लिकेशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल सोनी आणि संपादक संदीप तापकीर आदी या वेळी उपस्थित होते.

‘आधुनिक तंत्रज्ञानामुळे तपासण्या, निदान आणि उपचारांमध्ये सुलभता येणार आहे. वैद्यकीय क्षेत्रात मानवता, नैतिकता आणि सर्वसमावेशकता जपण्याची आवश्यकता आहे,’ असे प्रा. जोशी म्हणाले.

‘आधुनिक तंत्रज्ञानामुळे अनेक क्षेत्रांत बदल होत आहेत. हे बदल प्रेरणादायी आणि नावीन्यपूर्ण आहेत. शहरी भागातील विद्यार्थी तंत्रज्ञानातील बदल सहजतेने स्वीकारू शकतात. ग्रामीण भागातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ व्हावा, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे,’ असे मत डॉ. संजय चोरडिया यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन प्राजक्ता चित्रे यांनी केले. आभार संदीप तापकीर यांनी मानले.

लोकमत

# वैद्यकशास्त्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढावा : डॉ. आनंद देशपांडे

## ‘आरोग्य सेवेतील डिजिटल आणि एआय क्रांती’ पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : ‘आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) आणि डिजिटल टेक्नॉलॉजीमुळे आरोग्य क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात क्रांती घडत आहे. आजच्या काळातील डॉक्टरांनी फक्त वैद्यकीय क्षेत्रापुरते मर्यादित न राहता वैद्यक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे,’ असे मत डॉ. आनंद देशपांडे यांनी केले.




‘आरोग्य सेवेतील डिजिटल आणि एआय क्रांती’ पुस्तक प्रकाशन प्रसंगी (डावीकडून) विशाल सोनी, भरत अगरवाल, डॉ. अविनाश भोंडवे, डॉ. आनंद देशपांडे, प्रा. मिलिंद जोशी, डॉ. संजय चोरडिया, डॉ. दीपक शिकारपूर, संदीप तापकीर.

डॉ. अविनाश भोंडवे व डॉ. दीपक शिकारपूरलिखित आणि विश्वकर्मा पब्लिकेशन प्रकाशित ‘आरोग्यसेवेतील डिजिटल आणि एआय क्रांती’ या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवारी (दि.१४) डॉ. देशपांडे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी होते. यावेळी सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया, विश्वकर्मा युनिव्हर्सिटी व विश्वकर्मा ग्रुपचे अध्यक्ष भरत अगरवाल, सीईओ विशाल सोनी, संपादक संदीप तापकीर व्यासपीठावर होते.

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले की, आरोग्य सेवेतील डिजिटल क्रांतीचे स्वागतच आहे. त्यामुळे तपासण्या, निदान आणि उपचार यात सुलभता येणार असली तरी या क्रांतीत मानवता, नैतिकता आणि सर्वसमावेशकता जपली जावी. डॉ. भोंडवे म्हणाले की, गेल्या तीस ते चाळीस वर्षांत देशातील वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली आहे. डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वैद्यकीय क्षेत्रात मानवाला होणारा उपयोग वाचकांसमोर आणण्यासाठी या पुस्तकाची निर्मिती केली आहे.

डॉ. संजय चोरडिया म्हणाले की , शहरी भागातील विद्यार्थी तंत्रज्ञानातील बदल सहजतेने स्वीकारू शकतात, परंतु अशा पुस्तकांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना या ज्ञानाचा लाभ व्हायला हवा. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता चित्रे यांनी केले तर आभार संदीप तापकीर यांनी मानले.

# मेडिकल फील्ड में डिजीटलाइजेशन और एआय लाभकारी

## डॉ. अविनाश भोंडवे की पुस्तक "आरोग्यसेवेतील डिजीटल आणि एआय क्रांति" के विमोचन पर भरत अग्रवाल ने कहा

**पुणे, 14 मई**

**(आज का आनंद न्यूज नेटवर्क)**




डिजीटलाइजेशन के बाद अब एआय हर क्षेत्र में अपने पैर पसार रहा है. विश्वकर्मा यूनिवर्सिटी के एम. डी. भरत अग्रवाल का मानना है कि चैटबोट जैसी तकनीक डॉक्टरों की बेहतर इलाज करने में बेहद मददगार साबित हो रही है. जब चैटबोट को थोड़ी सी जानकारी मिलने पर यह सूक्ष्मता से हमारी मेडिकल जांच कर सकता है तो सोचिए यह तकनीक मेडिकल साईन्स में डॉक्टरों के लिए कितनी मददगार साबित हो सकती है. भरत अग्रवाल, डॉ. अविनाश भोंडवे द्वारा लिखित "आरोग्यसेवेतील डिजीटल आणि एआय क्रांति" पुस्तक के विमोचन समारोह में बोल रहे थे.

डिजीटलाइजेशन और एआय के बढ़ते कदमों को मद्देनजर रखते हुए, डॉ. अविनाश भोंडवे द्वारा यह पुस्तक लिखी गई है. महाराष्ट्र साहित्य परिषद में 14 मई मंगलवार को इस पुस्तक का विमोचन, संस्थापक अध्यक्ष पर्सिस्टेंट सिस्टम डॉ. आनंद देशपांडे के द्वारा किया गया. विश्वकर्मा पब्लिकेशन ने इस पुस्तक को प्रकाशित किया है. पुस्तक विमोचन का यह कार्यक्रम महाराष्ट्र साहित्य परिषद में आयाजित किया गया.

मंच पर पुस्तक के लेखक डॉ. अविनाश भोंडवे फैमिली फिजीशियन एमबीबीएस, डॉ. दीपक शिकारपुर सह लेखक, मिलिंद जोशी (कार्याध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद), डॉ. आनंद देशपांडे (संस्थापक अध्यक्ष पर्सिस्टेंट सिस्टम), डॉ. संजय चोरडिया (संस्थापक अध्यक्ष सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इंस्टिट्यूट), भरत अग्रवाल (एम डी), विशाल सोनी (मुख्य कार्यकारी अधिकारी, विश्वकर्मा पब्लिकेशन), संदीप तापकीर (सह–संपादक) आदि उपस्थित थे.

डॉ. अविनाश भोंडवे, पुणे शहर के जाने–माने चिकित्यक हैं और मेडिकल क्षेत्र में इससे पहले भी अनेक पुस्तकें लिख चुके हैं. उनकी लिखी पुस्तक "आरोग्यसेवेतील डिजीटल आणि एआय क्रांति" अपने आप में मेडिकल साइंस और तकनीक का अनोखा उदाहरण है. इस पुस्तके में यह बतया गया है कि एआई मेडिकल और डॉक्टर पेशे के लिए घातक नहीं, बल्कि एक वरदान है.